# चोला आणि आयशर पोलारिसची भागीदारी

मुंबई : चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट आणि फायनान्स कंपनी लिमिटेड (चोला) तसेच आयशर पोलारिस प्रा. लि. यांच्यात धोरणात्मक करार झाला असून त्यांनी त्यांच्या ग्राहकांकरिता ऑटो रिटेल फायनान्स उपलब्ध करून दिला आहे. आयशर पोलारिस प्रा. लि.ने अलीकडेच मल्टीक्स लॉन्च केली. ही भारतातील पहिली पर्सनल युटिलिटी व्हेईकल असून 'स्वतंत्र व्यावसायिक' हे त्यांचे लक्ष्य आहे. या भागीदारीच्या माध्यमातून मल्टीक्सच्या नियोजित ग्राहकांना सोयीचे, त्वरित आणि सोपे आकर्षक वाहन वित्त पर्याय पुरवण्याचा चोलाचा उद्देश आहे. मल्टीक्सच्या वाहन बांधणीमागचा उद्देश हा एकाच वाहनाचा कुटुंब, व्यापारी वापर आणि ग्राहकासाठी शक्ती निर्मिती असे एकात तीन फायदे समाविष्ट आहेत. या सेगमेंटमध्ये वाढ व्हावी, या उद्देशाने मल्टीक्सचे अनावरण ३० शहरांत करण्याचे ठरवले आहे. वाहनांची डिलिव्हरी ऑगस्ट २०१५ पासून सुरू होणार आहे. आयशर पोलारिस प्रा. लि.सोबत करारात प्रवेश केल्यावर चोला मल्टीक्स वित्त साहाय्यक बनला आहे. यासोबत मल्टीक्ससाठी ऑटो रिटेल फायनान्स चोलाच्या ५३४ शाखांमध्ये आणि देशभर मल्टीक्सच्या नियोजित डीलरशिप ठिकाणी उपलब्ध होणार आहे.